सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५० | शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१४ नोव्हेंबर

- जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची (जेएनयू) स्थापना.
- मरिनर-९ यान मंगळाच्या कक्षेत प्रवेश केला.
- सचिन तेंडुलकरने शेवटचा (२०० वा) कसोटी सामना खेळला. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर वेस्ट इंडिज विरुद्ध सामना रंगला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

# आला हिवाळा, आरोग्य सांभाळा...!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लहान मुले वातावरणातील गारठा फारसा सहन करु शकत नाहीत. यामुळेच हिवाळ्यात मुलांची इम्युनिटी बिघडून त्यांना ताप, खोकला, सर्दी, कफ असे असे लहान- मोठे आजार होतात. मोठ्या माणसांच्या तुलनेत लहान मुलांची प्रतिकारक शक्ती तितकी स्ट्राँग नसते. यामुळे हिवाळ्यात लहान मुलांच्या तब्येतीची खूप काळजी घेतली पाहिजे. यासाठीच, मुलांचे आजारपण टाळून हिवाळ्यातही त्यांना ठणठणीत ठेवायचं असेल तर ऋतुमानानुसार काही महत्वाच्या गोष्टींची काळजी घेणे अतिशय महत्वाचे आहे. थंडीचा पारा वाढू लागला की, मुलांची इम्युनिटी बिघडू नये म्हणून पालकांनी लक्षात ठेवाव्यात अशा तीन खास गोष्टी कोणत्या ते पाहूयात.

**मुलांना हायड्रेट ठेवा**

हिवाळ्यात वातावरणातील गारठ्याने शक्यतो फारशी तहान लागत नाही. तहान न लागल्यामुळे या दिवसात शरीराला आवश्यक तितके पाणी मिळत नाही. यामुळे आपल्या शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होते. वातावरणातील बदलांमुळे घराबाहेर पडल्याने शरीरातील हायड्रेशनची पातळी घसरते. थकवा जाणवू लागतो. घरातून बाहेर पडताना कायम मुलांसोबत पाण्याची बाटली नक्की द्यावी. जितकी तहान लागेल तितके पाणी सतत पीत राहावे, असे मुलांना सांगावे. पाण्यामध्ये आवळा आणि लिंबू असे अँटीऑक्सिडंट्स देखील मिसळता येतील. ज्यामुळे मुलांच्या शरीरातील हायड्रेशनची पातळी वाढेल. मुलांचे शरीर डिहायड्रेट झाले आहे, अथवा नाही हे समजून घेण्याचा अजून एक सोपा मार्ग म्हणजे त्यांच्या लघवीचा रंग. अतिशय हलक्या, फिकट रंगाची लघवी होणे याचा अर्थ शरीराला आवश्यक तितके पुरेसे पाणी मिळत आहे. याउलट, गडद पिवळा रंग असेल तर पाण्याची कमतरता आहे हे पालकांनी लक्षात घ्यावे.

**व्हिटॅमिन 'डी'**

जर आपले मूल वारंवार आजारी पडत असेल तर त्यांच्या शरीरातील व्हिटॅमिन 'डी' ची कमतरता नाही ना हे पालकांनी एकदा तपासून घेणे आवश्यक आहे. शरीरातील इम्युनिटी वाढण्यासाठी व्हिटॅमिन 'डी' ची योग्य मात्रा आपल्या शरीरात असणे आवश्यक आहे. सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन 'डी' चा उत्तम स्रोत मानला जातो. सध्या बदलत्या लाईफस्टाइलमुळे सूर्यप्रकाशाशी मुलांचा थेट संबंध येत नाही. त्यामुळे त्यांच्या शरीरात व्हिटॅमिन 'डी' ची कमतरता भासू शकते. दही, पालक, पनीर, गाजर, संत्री अशा व्हिटॅमिन 'डी' युक्त पदार्थांचा मुलांच्या आहारात समावेश करावा.

**योग्य आहार**

हिवाळ्यात मुलांच्या डाएटकडे (आहार) पालकांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांना बाहेरचे अन्नपदार्थ खायला देऊ नये. घरचे ताजे, सकस जेवण खायला द्यावे. प्रोसेस्ड फूड, साखर, मैदा, फास्ट फूड, जंक फूड यांसारखे पदार्थ मुलांना खायला देऊ नये. याउलट, पालेभाज्या, सिझनल फळ खाण्यावर अधिक भर द्यावा.

# रिक्षात कोंबुन भरलेल्या चिमुकल्यांचा जीव टांगणीला!

## शाळा प्रशासनांसह पालकांनी गांभिर्याने लक्ष देण्याची गरज

**ग्लोबल महातेत वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील अनेक शाळांमधील विद्यार्थी हे खासगी वाहनांनी प्रवास करतात. खासगी वाहन चालक विद्यार्थ्यांना अक्षरशः कोंबून कोंबून वाहनात बसवितात. काही शाळांचे विद्यार्थी हे रिक्षाने प्रवास करतात. मात्र, ही वाहतूक विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतणारी आहे. याबाबत शाळा प्रशासन व संबंधित पालकांनी गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

अमळनेर शहर व तालुक्यात शैक्षणिक संस्थांचा विस्तार वाढला आहे. नर्सरीपासून ते दहावीपर्यंतचे अनेक विद्यार्थी हे वाहनांमधून शाळेत प्रवास करतात. अनेक शाळांच्या स्वतःच्या बस गाड्या आहेत. या गाड्या सुरक्षित असल्याने पालक प्रथम प्राधान्य त्यांना देतात. मात्र, या बस गाड्या मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. मात्र, सर्वच शाळांमध्ये या बस गाड्यांची सोय नाही. मर्यादेबाहेर विद्यार्थ्यांची संख्या गेल्यास पालकांना खासगी वाहनांचा आसरा घ्यावा लागतो. परिणामी खासगी वाहन चालक हे मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहनात बसवितात. यामुळे शाळकरी मुलांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. शहरात मोठ्या प्रमाणात अनेक विद्यार्थी हे रिक्षाने प्रवास करताना दिसतात. त्यांचे अवजड दप्तर हे रिक्षाच्या एका दांड्याला बांधलेले असतात. रिक्षा चालक पुढील सीटावरही विद्यार्थ्यांना स्वतःच्या बाजूला बसवितात. यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. काही शहरात यापूर्वी रिक्षांचा अपघात होऊन काही विद्यार्थी दगावल्याच्याही घटना घडल्या आहेत. यामुळे पालकांनी याबाबत सावधानता बाळगण्याची गरज आहे. खासही वाहनाचा वापर करावयाचाच झाला, तर त्यांच्या सुरक्षिततेबाबतही दक्षता बाळगण्याची गरज आहे. खासगी वाहन चालकांनीही मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थी घेऊन जाणे गैर आहे. नादुरुस्त वाहने चालवू नये. याबाबत शैक्षणिक संस्थांचे संचालक, मुख्याध्यापक व शिक्षकांनी लक्ष देण्याची मागणी सूज्ञ नागरिकांकडून होत आहे.



(छायाचित्र : मयूर चौधरी)

**सुरक्षिततेच्या उपाययोजना**

- खासगी वाहने ही सर्व प्रकारे सुरक्षित असावीत.
- वाहनांना शाळा व आरटीओंची परवानगी असावी.
- वाहनांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित ठेवावी.
- विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था सुरक्षित असावी.
- खिडक्यांना भक्कम जाळ्या असाव्यात.
- रिक्षांना भक्कम दरवाजे असावेत.
- दप्तर ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.

## मंगलमूर्ती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर कोठावदे यांचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- येथील मंगलमूर्ती सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर शंकर कोठावदे उर्फ बापूसाहेब वाणी (वय ७०) यांचे बुधवार, दि. १२ रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले.

प्रभाकर कोठावदे हे बापू वाणी या नावाने संपूर्ण तालुक्यात परिचित होते. त्यांनी अर्बन बँक, खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमनपद, वाणी समाजाचे अध्यक्षपद, भाजपचे शहराध्यक्ष, नगरसेवक आदी पदे भुषविली आहेत. मंगलमूर्ती व आशापुरी पतसंस्थेवर त्यांचा मोठा प्रभाव होता. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, दोन भाऊ असा परिवार आहे. सुधाकर उर्फ बाळू कोठावदे, दिलीप कोठावदे यांचे ते बंधू, तर सचिन कोठावदे व विनोद उर्फ बंटी कोठावदे यांचे ते वडील होत. बापूसाहेब वाणी यांच्या निधनाने त्यांच्या परिवारासह, संपूर्ण शहर व तालुक्यात शोककळा पसरली आहे. सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता लाडशाखीय वाणी मंगल कार्यालयात त्यांचे उत्तरकार्य होणार आहे.

## सोने, चांदीचे दर पाहुन ग्राहकांचे डोळे विस्फारले!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमेरिकन कायदेतज्ज्ञांनी खर्चाच्या विधेयकाला मंजुरी दिली आहे. यामुळे डॉलरमध्ये घसरण झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किंमती वाढल्या आहेत. त्याचा थेट परिणाम भारतातील बाजारपेठांवर झाला आहे. गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी बाजार उघडताच सोने, चांदीच्या दराने अचानक ऊसळी घेतली. सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम १ लाख ३० हजार, तर चांदीत तब्बल ९ हजार २७० रुपयांनी वाढ झाली.

## 'व्हीओएम'तर्फे उमेश काटे यांना 'उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्कार'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे येथील तालुकाध्यक्ष उमेश प्रतापराव काटे यांना 'उत्कृष्ट तालुकाध्यक्ष पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. व्हाईस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या वतीने राज्यातील केवळ पाच तालुकाध्यक्षांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली अमळनेर येथे पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, उत्कृष्ट गणेश मंडळाचा सन्मान, विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. अमळनेर येथे 'राज्यस्तरीय केडर कॅम्प' यशस्वीरित्या पार पडला आहे. या सर्व कामाची दखल घेऊन राज्यस्तरीय निवड समितीने नाशिक विभागातून उमेश काटे यांची 'उत्कृष्ट तालुकाध्यक्ष' पुरस्कारासाठी निवड केली आहे. १५ व १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे होणाऱ्या अधिवेशनात संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, महासचिव दिव्या भोसले, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत श्री. काटे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल नाशिक विभागीय अध्यक्ष मिलिंद टोके, जिल्हाध्यक्ष कल्पेश महाले यांच्यासह जिल्हा व तालुका कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



अमळनेरसह परिसरात थंडीचा जोर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पाचपावली देवी चौकात गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर राजी उबदार कपडे खरेदी करताना नागरिक. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# ग्लोबल महातेजच्या बातमीचा दणका!

## भद्राप्रतिक मॉल ते बजरंग पेट्रोल पंप रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात

### सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दै. ग्लोबल महातेजच्या बातमीची दखल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**






अमळनेर- शहरातील भद्राप्रतीक मॉल ते बजरंग पेट्रोलपंपादरम्यानच्या रस्त्यावरील ( राज्य महामार्ग क्र. ६ ) खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले आहे. मात्र, नुसता थुंकी लावून चिकटविण्याचा हा प्रकार होता. याबाबत दै. ग्लोबल महातेजने बुधवार, दि. १२ रोजी 'छे..! नुसता थुंकी लावून चिकटविण्याचा प्रकार, वाहनचालकांचा आरोप; सार्वजनिक बांधकाम विभागाचा दिखावा उघड' या मथळ्याखाली ठळक वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेऊन बांधकाम विभाग खडबडून जागे झाले. गुरुवार, दि. १३ रोजी सकाळी हे खड्डे पुन्हा साफसफाई करुन बुजण्याचे काम सुरु केले आहे.

अमळनेरहून शिरपूर, दोंडाईचा, नंदुरबार असा हा मुख्य प्रवासमार्ग आहे. दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर सततच्या पावसामुळे मोठ्या संख्येने मोठमोठे खड्डे पडले होते. त्यामुळे वाहनचालकांची या रस्त्यावरून ये-जा करताना कसरत होत होती. अनेक लहान-मोठे अपघातही घडले होते. या पार्श्वभूमीवर काही तरुणांनी पुढाकार घेत स्वतःच खड्ड्यांमध्ये मुरूम टाकला होता. तसेच वाहनचालकांनी सावध राहावे, यासाठी चुन्याने चिन्हेही काढली होती. परिसरातील नागरिकांनीही संताप व्यक्त करीत रस्त्यावर स्वतःहून बॅरिकटस् उभारले होते. वाहतूक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत होते. याबाबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे डोळे उघडले आणि तातडीने कार्यवाही करत खड्डे बुजविले. मात्र, हे काम म्हणजे नुसताच थुंकी लावून चिकटविण्याचा प्रकार केला गेला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांसह वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याबाबत नागरिकांनी दै. ग्लोबल महातेजकडे तक्रारी केल्या होत्या. याअनुषंगाने दै. ग्लोबल महातेजने या समस्येला वाचा फोडली. याची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने कामास सुरुवात केली. दै. ग्लोबल महातेजच्या वृत्ताने न्याय मिळाल्याची भावना, नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# कर्नाटकच्या शाळांमधील दूध पावडरचा महाराष्ट्रात मोठा काळाबाजार!

## शासनाकडून कारवाई होणार का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मिठाई उत्पादनातील भेसळीसंदर्भात प्रसारमाध्यमांनी बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. आता खव्याच्या निर्मितीमागे 'कर्नाटक कनेक्शन' असल्याचे उघड झाले आहे. कर्नाटकातील शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या दूध पावडरची महाराष्ट्रात आवक करून मोठा काळाबाजार सुरु आहे. राज्य शासनाकडून याबाबत कारवाई होईल का ? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.
नृसिंहवाडी येथेही कर्नाटकातील शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या दूध पावडरची मोठी आवक ओ. कर्नाटक सहकारी दूध उत्पादक फेडरेशनचा नंदिनी हा दूध संघ आहे. या दूध संघाकडून कर्नाटकातील शासकीय शाळांमधील विद्याथ्यर्थ्यांना क्षीर भाग्य योजनेअंतर्गत दूध पावडर देण्यात येते. मात्र, ही पावडर मुलांपर्यंत न पोहोचवता शाळेतील शिक्षकच त्याचे भक्षक बनले

पान ३ वर

### दूध पावडर म्हणजे भेसळ नव्हे!

दूध पावडर पासून खवा तयार करणे, ही भेसळ नाही, ते नियमानुसार आहे. मात्र, असे असले तरी कर्नाटकातील विद्यार्थ्यांच्या वाट्याची दूध पावडर हिसकावून नफा कमावणे हे गैर आहे. या कुटील कारस्थानात कर्नाटकातील शाळा तर सहभागी आहेतच. शिवाय मुंबई-पुण्यापासून ते बीडच्या येरमाळ्यापर्यंत ही पावडर जात असल्याने याची व्याप्ती वाढली आहे.

# मसाला पान



# ‘ सत्यनारायणाच्या पूजेला नकार अन् उघड झाला फसवणुकीचा बनाव

## ग्रामीण भागात बनावट लग्नांचे रॅकेट

## तरुण का करत नाहीत तक्रार ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात, विशेषतः वयाची तिशी ओलांडलेल्या तरुणांना लग्नासाठी जोडीदार शोधणे अवघड होत आहे. याचा फायदा घेत बनावट लग्नांचे रॅकेट चालविणाऱ्या टोळ्या लाखोंची फसवणूक करत आहेत. मात्र, सामाजिक दबाव आणि लाजेपोटी अनेक पीडित तरुण तक्रार करत नाहीत.

**सागरची कहाणी : ५ लाखांचे नुकसान**

जुन्नर तालुक्यातील सागर, एक यशस्वी शेतकरी, पुणे आणि मुंबईच्या एपीएमसी मार्केटमध्ये भाजीपाला विक्री करतात. बागायती शेतीमुळे त्यांची आर्थिक स्थिती स्थिर आहे, तरीही त्यांना लग्नासाठी मुलगी मिळणे कठीण झाले. अनेक प्रयत्नांनंतर मे २०२३ मध्ये मध्यस्थांमार्फत त्यांचे लग्न ठरले. मात्र, लग्नानंतर पहिल्याच आठवड्यात सागर यांना गडबड जाणवली. सागर सांगतात, की नवरीकडील लोकांनी लग्नाला घाई केली. मला मुलीशी वैयक्तिक बोलण्याची संधी मिळाली नाही. लग्नानंतर सत्यनारायण पूजेला तिने नकार दिला. भांडणानंतर तिने सांगितले, की तिचे आधीच लग्न झाले आहे. यात सागर यांचे ५ लाखांचे नुकसान झाले. ज्यात १.२ लाख रोख, २५ हजार लग्नखर्च आणि दागिन्यांचा समावेश आहे. सागर यांनी धाडसाने पोलिसांत तक्रार केली. ज्यामुळे मध्यस्थी करणाऱ्या टोळीला अटक झाली.



प्रतिकात्मक फोटो

**जुन्नरचे पोलीस उपअधीक्षक धनंजय पाटील म्हणतात, की सामाजिक लज्जेमुळे आणि वैयक्तिक चूक मानण्याच्या मानसिकतेमुळे पीडित तक्रार करत नाहीत. पण अशा रॅकेटला आळा घालण्यासाठी तक्रार करणे गरजेचे आहे. सागर यांनी खुलासा केला, की काही मुली स्वतः पीडित असतात आणि टोळीकडून त्यांचा वापर केला जातो. एका पीडित तरुणाने सांगितले, की माझी पत्नी दीड वर्षे राहिली. पण तिचे आधी आणि नंतरही लग्ने झाल्याचे इन्स्टाग्रामवरून कळले. ती टोळीच्या जाळ्यात अडकली होती.**

**बनावट लग्नांचे रॅकेट कसे कार्य करते?**

पोलिसांच्या मते- अशा टोळ्यांमध्ये ७-८ सदस्य असतात. ज्यात मुलगी, तिची ‘ आई ’, ‘ मामा-मामी ’, ‘ मध्यस्थ ’ आणि इतर असतात. ही टोळी खालीलप्रमाणे कार्य करते :

– **पहिला टप्पा :** मध्यस्थ मुलाच्या कुटुंबाला विश्वासात घेतात आणि लग्नासाठी घाई करतात.

– **पैसे उकळणे :** मुलीच्या ‘ आईच्या आजारपणासाठी ’ किंवा ‘ अनाथ मुलीच्या संगोपनासाठी ’ पैसे मागितले जातात.

– **फसवणूक :** लग्नानंतर मुलगी दागिने आणि पैसे घेऊन ‘ माहेरी ’ जाते आणि फरार होते.

बीडच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे सांगतात, की सप्टेंबर २०२५ मध्ये अशी तक्रार आली. तपासात असे दिसले, की मुलगी ८ दिवसांनी ‘ माहेरी ’ जाण्याच्या बहाण्याने फरार झाली. अशा टोळ्यांची विशिष्ट कार्यपद्धती आहे. त्यांच्या हद्दीत अशा दोन प्रकरणांत ४ आणि ६ आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

**सामाजिक प्रश्न आणि उपाय**

ग्रामीण भागात लग्नांचा प्रश्न हा केवळ फसवणुकीपुरता मर्यादित नसून, एक ज्वलंत सामाजिक समस्या आहे. मुलींचा जन्मदर वाढविणे, ग्रामीण जीवनशैलीत बदल आणि मुलींना स्वातंत्र्य देणे यावर उपाययोजना आवश्यक आहेत.

**ग्रामीण भागात लग्न का होत नाहीत?**

- **घटलेला मुलींचा जन्मदर :** महाराष्ट्रात मुलींचा जन्मदर कमी झाल्याने लग्नासाठी जोडीदार शोधणे कठीण आहे.
- **वाढलेल्या अपेक्षा :** मुली आणि पालकांना चांगली नोकरी, घर आणि प्रतिष्ठित कुटुंब हवे असते.
- **ग्रामीण जीवनशैली :** शेतीतील श्रम, परंपरा आणि घरकामाची जबाबदारी यामुळे मुली गावात लग्न टाळतात.
- **स्वातंत्र्याचा अभाव :** नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-४ (२०१५-१६) नुसार ग्रामीण भागात केवळ ४१ टक्के महिलांना संचार स्वातंत्र्य आहे.

सामाजिक कार्यकर्त्या रेणुका कड म्हणतात, की शिकलेल्या मुली शहराकडे वळतात. कारण गावात स्वातंत्र्य मर्यादित आहे. लेखिका श्वेता पाटील म्हणतात, की गावात सुनेला परंपरांचे ओझे सहन करावे लागते. शहरात मोकळेपणाने जगण्याची शक्यता असते.

**फसवणूक टाळण्यासाठी काय करावे?**

■ मुलीच्या कुटुंबाची संपूर्ण माहिती, शिक्षण आणि पार्श्वभूमी तपासा. ■ प्रत्यक्ष भेटी घेऊन गावकऱ्यांकडून माहिती मिळवा.
■ ऑनलाइन प्रोफाइल्सची सत्यता तपासा.
■ पैसे मागितल्यास सावध राहा. ■ मध्यस्थांचा अनुभव आणि विश्वासार्हता तपासा.

# मुकेश अंबानी की सुरक्षा कौन सी फोर्स करती है?

## जानें उनके सिक्योरिटी में कितने जवान रहते हैं तैनात



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देश के सबसे बड़े उद्योगपति और एशिया के सबसे अमीर व्यक्ति मुकेश अंबानी को भारत सरकार ने झेड प्लस सिक्योरिटी प्रदान की है। उनकी सुरक्षा में देश की सबसे बेहतरीन फोर्सेज शामिल हैं। आइए जानते हैं, कौन-कौन सी एजेंसियां उनकी सुरक्षा संभालती हैं और इन कमांडोज़ को कितनी सैलरी मिलती है।

**झेड प्लस सिक्योरिटी मिला हुआ है**

भारत के सबसे प्रभावशाली बिजनेसमैन मुकेश अंबानी की सुरक्षा व्यवस्था बेहद सख्त और हाई-टेक मानी जाती है। उन्हें झेड प्लस सिक्योरिटी मिला हुआ है, जो देश में मिलने वाली सबसे ऊंची श्रेणी की सुरक्षा है।

**१० से अधिक एनएसजी कमांडो**

इस सुरक्षा व्यवस्था में एनएसजी और सीआरपीएफ जैसे शीर्ष बल शामिल हैं। रिपोर्ट्स के अनुसार अंबानी की सुरक्षा में लगभग १० से अधिक एनएसजी कमांडो और ५० से ज्यादा सीआरपीएफ के जवान तैनात रहते हैं।

**मुंबई पुलिस की लगातार तैनाती**

मुंबई में स्थित अंबानी के घर एंटीलिया पर हमेशा सुरक्षा बलों की कड़ी निगरानी रहती है। यहां मुंबई पुलिस भी लगातार तैनात रहती है। जब भी अंबानी दूसरे राज्यों में यात्रा करते हैं, तो स्थानीय पुलिस भी इस सिक्योरिटी में शामिल हो जाती है।

**देश की सबसे प्रशिक्षित सुरक्षा कर्मियों में गिनती**

आपको बताते चलें, एनएसजी कमांडो देश की सबसे प्रशिक्षित सुरक्षा कर्मियों में गिने जाते हैं। इनकी ट्रेनिंग बेहद कठिन होती है और इन्हें सीआरपीएफ, बीएसएफ, आईटीबीपी और सीआईएसएफ जैसी फोर्सेज से चुना जाता है।

**गृह मंत्रालय के अधीन**

नेशनल सिक्योरिटी गार्ड की स्थापना १६ अक्टूबर १९८४ को की गई थी। यह गृह मंत्रालय के अधीन काम करती है और आतंकवाद तथा वीआईपी सुरक्षा जैसे विशेष मिशनों में सक्रिय रहती है।

**कितनी है सैलरी**

सैलरी की बात करें तो एनएसजी कमांडो को उनके पदानुसार वेतन दिया जाता है। मीडिया रिपोर्ट्स के अनुसार, इनकी मासिक सैलरी करीब ५० हजार रुपये से ६० हजार रुपये तक होती है, हालांकि इस पर कोई आधिकारिक पुष्टि नहीं है। कुल मिलाकर, अंबानी की सिक्योरिटी भारत की सबसे सख्त और संगठित निजी सुरक्षा व्यवस्थाओं में गिनी जाती है, जो किसी भी स्थिति में सुरक्षा में सेंध नहीं लगने देती।

# सुरेश रैना, शिखर धवन यांच्या करोडोंच्या मालमत्तेवर जप्ती

**ईडी कडून सट्टेबाजी केल्याप्रकरणी कडक कारवाई**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताचे माजी क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन यांना मोठा धक्का बसला आहे. कारण अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) या दोघांना सट्टेबाजी केल्याप्रकरणी दोषी ठरविले असून, त्यांच्यावर कडक कारवाई केली आहे. त्यात या दोघांच्या करोडो रुपयांच्या मालमत्तेवर आता जप्ती आणली आहे. वनएक्सबेट मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने माजी क्रिकेटपटू रैना आणि धवन यांच्या ११ कोटी १४ हजार रुपयांच्या मालमत्तेवर तात्पुरती जप्ती आणली आहे. ईडीने जप्त केलेल्या मालमत्तेत रैनाच्या नावावर ६ कोटी ६४ हजार रुपये आणि शिखर धवनच्या नावावर ४ कोटी पाच हजार रुपये किमतीचे म्युच्युअल फंड समाविष्ट आहेत.

कंपनी बेकायदेशीर आहे हे माहीत असूनही दोन्ही खेळाडूंनी वनएक्सबेट प्रतिनिधींना पाठिंबा दिल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले आहे. एजन्सीने सहा हजारांहून अधिक म्युच्युअल खाती आणि अनेक असत्यापित पेमेंट गेटवेशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणाचाही पर्दाफाश केला आहे. ईडीने आतापर्यंत चार कोटी रुपयांहून अधिक आणि ६० बँक खाती गोठविली आहेत. पुढील तपास सुरू आहे. ईडीच्या मते दोन्ही खेळाडूंनी जाणूनबुजून वनएक्सबेट आणि त्याच्याशी संबंधित सरोगेट ब्रँडचा प्रचार केला. ज्यामुळे भारतात बेकायदेशीर जुगाराला प्रोत्साहन मिळाले. याव्यतिरिक्त खेळाडूंनी परदेशी कंपन्यांसोबत प्रमोशनल करार केले आणि परदेशी चॅनेल वापरून लेयर ट्रान्झॅक्शनद्वारे पेमेंट मिळवले. बेकायदेशीर निधीची खरी ओळख देखील लपवण्यात आली. या तपासादरम्यान अनेक राज्यांमध्ये पोलिसांनी एफआयआर दाखल केले आहेत, हे उल्लेखनीय आहे. एफआयआरमध्ये कंपन्यांवर फसवणूक, ऑनलाइन बेटिंग आणि बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांचे आरोप होते. या आरोपांच्या आधारे, ईडीने मनी लाँड्रिंगचा खटला सुरू केला आणि तपास सुरू केला, ज्यामध्ये परदेशी खात्यांशी संबंधित फायली आणि हवाला नेटवर्कशी संबंधित कागदपत्रे उघडकीस आली. वनएक्सबेटने क्रीडा प्रमोशन कॉन्ट्रॅक्टद्वारे भारतातील क्रीडा चाहत्यांमध्ये आपली पोहोच निर्माण केली. त्यांनी त्यांच्या ॲपचा प्रचार करण्यासाठी सेलिब्रिटी आणि प्रभावशाली लोकांना पैसे दिले.



**७२ वर्षीय आजोबांचा अचंबित करणारा प्रवास :**

# सायकलने जाताहेत ५० कि.मी. दूर कॉलेजला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नेयवली, तमिळनाडू : वयाच्या ७२ व्या वर्षीही शिक्षणाची आग अखंड ठेवणारे सेल्वामणी हे आजोबा सध्या तमिळनाडूसह संपूर्ण देशभरात चर्चेचा विषय ठरले आहेत. नेयवली लिग्नाइट कॉर्पोरेशनमध्ये ३५ वर्षे नोकरी केल्यानंतर निवृत्त झालेले सेल्वामणी दररोज ५० किलोमीटर सायकल चालवून कॉलेजला जाऊन डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. त्यांच्या या अथक जिद्दीने आणि चिकाटीने समाजातील प्रत्येक वयोगटाला प्रेरणा दिली आहे.

**प्रवासाची प्रेरणादायी कहाणी**

सकाळी सूर्य उगवण्यापूर्वीच सेल्वामणी आपली जुनी, पण विश्वासू सायकल घेऊन घराबाहेर पडतात. ५० किलोमीटरचा रस्ता म्हणजे काही साधी गोष्ट नाही. खड्डेमय रस्ते, दमछाक करणारी वाहनांची गर्दी, कधी तळपते ऊन, तर कधी मुसळधार पाऊस या सगळ्यांना न जुमानता ते कॉलेज गाठतात. वयामुळे येणारा शारीरिक ताण त्यांना रोखू शकत नाही. शिक्षण माझे स्वप्न आहे. स्वप्नांना वयाची बंधने नसतात, असे ते ठामपणे सांगतात.

**लहानपणी राहिलेले स्वप्न**

सेल्वामणी यांना लहानपणी कौटुंबिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागले. नोकरी, कुटुंब आणि जबाबदाऱ्यांमुळे त्यांचे स्वप्न मागे पडले होते. पण निवृत्तीनंतर त्यांनी ठरवले, की आता वेळ आली आहे ती स्वप्ने पूर्ण करण्याची. डिप्लोमा अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन त्यांनी आपल्या शिक्षणाचा प्रवास पुन्हा सुरू केला. मला फक्त डिग्री नाही, तर ज्ञान हवे आहे, असे ते म्हणतात.

**कॉलेजमधील प्रेरणास्थान**

नेयवलीतील स्थानिक कॉलेजमध्ये सेल्वामणी हे विद्यार्थ्यांमध्येही सुपरस्टार ठरले आहेत. त्यांचे सहाध्यायी, जे त्यांच्यापेक्षा वयाने खूपच लहान आहेत, त्यांना आदराने आजोबा प्रोफेसर म्हणतात. त्यांच्याकडून आम्हाला मेहनतीचे आणि चिकाटीचे धडे मिळायचे, असे एका



विद्यार्थ्याने सांगितले. प्राध्यापकही त्यांच्या निष्ठेचे कौतुक करतात. सेल्वामणी यांच्यासारखा विद्यार्थी आम्हाला शिकवणारा गुरू आहे, असे कॉलेजच्या प्राचार्यांनी म्हटले.

**सामाजिक संदेश**

सेल्वामणी यांचा हा प्रवास फक्त त्यांच्यापुरता मर्यादित नाही. त्यांच्या कहाणीने समाजाला एक मोठा संदेश दिला आहे. शिक्षणाला वयाची मर्यादा नसते. स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कधीच उशीर झालेला नसतो. सोशल मीडियावर त्यांच्या या प्रेरणादायी कथेची चर्चा जोरात सुरू आहे. अनेकांनी त्यांना रिअल हिरो आणि प्रेरणास्थान, अशी उपाधी दिली आहे.

**आव्हानांना तोंड देताना**

हा प्रवास सोपा नाही. कधी सायकल पंक्चर होते, कधी प्रकृती साथ देत नाही, तरीही सेल्वामणी थांबत नाहीत. त्यांच्या कुटुंबीयांनीही त्यांच्या या जिद्दीला सलाम केला आहे. आमच्या आजोबांचा आम्हाला अभिमान आहे, असे त्यांचा नातू सांगतो. स्थानिक समुदायानेही त्यांना पाठिंबा देण्यास सुरूवात केली आहे. काही तरुणांनी त्यांना इलेक्ट्रिक सायकल भेट देण्याची तयारी दर्शविली आहे. सेल्वामणी म्हणतात, की माझी सायकल आणि माझी मेहनत मलाच हवी.

**प्रेरणेचा झरा**

सेल्वामणी यांचा हा प्रवास प्रत्येकासाठी एक प्रेरणा आहे. वय, परिस्थिती किंवा अडथळे यांना न जुमानता स्वप्नांचा पाठलाग करणाऱ्या या आजोबांनी सिद्ध केले, की खरी इच्छा असेल तर काहीही अशक्य नाही. जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत मी शिकणार, असे सांगणारे सेल्वामणी आज खऱ्या अर्थाने शिक्षणाचा झरा बनले आहेत.

**सक्सेस स्टोरी**

## महाराष्ट्रातील दुग्ध सहकार चळवळीने प्रेरित तरुणाचा प्रवास;

# आज ‘ वैशाली डेअरी ’ची ४ कोटींची उलाढाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ओडिशातील एका तरुणाने महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळीतून प्रेरणा घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू केला. वडिलांकडून मिळालेल्या भांडवलाच्या बळावर सुरूवातीचे दीड वर्ष खडतर प्रवासातून गेलेला हा तरुण आजमितीस ‘ वैशाली डेअरी प्रायव्हेट लिमिटेड ’च्या माध्यमातून ४ कोटींची वार्षिक उलाढाल करतो आहे.

**सुरेंद्र नाथ यांचा प्रेरणादायी प्रवास :**

सुरेंद्र नाथ मूळचे ओडिशातील गंजाम जिल्ह्यातील कुकुडाहांडी गावाचे. त्यांनी २०१३ मध्ये पुण्यात एक्साइड इंडस्ट्रीजमध्ये नोकरी सुरू केली. तेथे त्यांना महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ जवळून पाहण्याची संधी मिळाली. भारत हा जगातील सर्वांत मोठा दूध उत्पादक देश असला, तरी ग्रामीण भागात आणि लहान शहरांत शुद्ध दुधाचा पुरवठा कमी आहे, हे त्यांनी हेरले. वाढते शहरीकरण आणि उत्पन्न यामुळे शुद्ध दुधाची मागणी वाढत होती. या संधीचा फायदा घेण्यासाठी त्यांनी २०१६ मध्ये २८ हजार रुपये मासिक पगाराची नोकरी सोडली आणि गावी परतण्याचा धाडसी



निर्णय घेतला.

**‘ वैशाली डेअरी ’ची सुरूवात :**

२०१७ मध्ये सुरेंद्र यांनी वडील ए. विद्याधर यांच्या मदतीने ६ लाख रुपयांच्या भांडवलातून ‘ वैशाली डेअरी प्रायव्हेट लिमिटेड ’ची स्थापना केली. सुरूवातीला केवळ दोन शेतकऱ्यांनी दूध पुरवठा केला. दररोज २०-३० लिटर दूध मिळत असे. सुरेंद्र स्वतः बाटल्या धुवायचे, मशीनने भरायचे आणि ३६ रुपये प्रतिलिटर दराने विकायचे. दीड वर्षाच्या अथक परिश्रमानंतरही मासिक फक्त ५ हजार रुपये नफा मिळत होता. तरीही त्यांनी हार मानली नाही.

**वाढ आणि यश :**

२०१९ मध्ये २४ लाख रुपये बँक कर्ज घेऊन त्यांनी फ्रिजिंग, पॅकेजिंग आणि धुलाईची उपकरणे बसविली. यामुळे २५ शेतकऱ्यांकडून दररोज ४०० लिटर दूध संकलन सुरू झाले. २०१९-२० मध्ये वार्षिक उलाढाल ७० लाख रुपयांपर्यंत पोहोचली. गुणवत्तेवर सातत्याने लक्ष केंद्रित केल्याने २०२१-२२ पर्यंत ६० शेतकऱ्यांकडून ७०० लिटर दूध गोळा होऊ लागल. उलाढाल २ कोटींवर गेली. आता ‘ वैशाली डेअरी ’ पूर्ण क्षमतेने (२००० लिटर) कार्यरत आहे. २५० शेतकरी दररोज दूध पुरवितात.

**‘ अनंत सागर ’ ब्रँड :**

दुधापैकी ५०% दूध ‘ अनंत सागर ’ ब्रँडअंतर्गत छेना, छेना पोडा, दही, पेढा, रसगुल्ला आणि गुलाब जामुन यांसारख्या १२ दुग्धजन्य पदार्थांसाठी वापरले जाते. हे पदार्थ ओडिशातील स्थानिक मागणी पूर्ण करतात आणि ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहेत.

**भविष्यातील योजना :**

सुरेंद्र यांची डेअरी उच्चप्रतीचे, कॅल्शियम, लोह आणि ओमेगा-३ यांनी समृद्ध गाईचे कच्चे दूध पुरविते. सध्या ३५ कर्मचारी दूध संकलन, पॅकेजिंग आणि मार्केटिंगच्या कामात गुंतले आहेत. २०२३ मध्ये त्यांनी ७० लाख रुपये बँक कर्ज मिळविल. ज्यात राज्य अन्नप्रक्रिया धोरणांतर्गत ३५% सबसिडीचा समावेश आहे. आता ते कुकुडाहांडी येथे ४ एकर जमिनीवर १ कोटी रुपये खर्चून ३५० देशी गायींसह फार्म उभारण्याची योजना आखत आहेत. याशिवाय अनेक जिल्ह्यांमध्ये व्यवसाय विस्ताराचे त्यांचे उद्दिष्ट आहे. सुरेंद्र नाथ यांनी महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळीपासून प्रेरणा घेऊन, धाडस आणि मेहनतीने ग्रामीण भागात उद्योजकतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा हा प्रवास प्रत्येक तरुण उद्योजकासाठी प्रेरणादायी आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## महाराष्ट्रात मोठा काळाबाजार!

पान १ वरून

आहेत. दलालांमार्फत महाराष्ट्रातील खवा उत्पादकांना ही दूध पावडर विकली जाते. इतर दूध पावडरच्या तुलनेत ही पावडर कमी किमतीत मिळते. नफ्याचे गणित साधून खवा उत्पादकही या कुटिल साखळीचा हिस्सा बनले आहेत. एक किलो खवा तयार करण्यासाठी कमीतकमी चार लिटर दूध आटवावे लागते. यानुसार विक्री करायची झाल्यास ते आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. म्हणूनच कमी किमतीत कर्नाटकातील मुलांच्या वाट्याची दूध पावडर लुबाडून खवा उत्पादक मालामाल होत आहेत. काही महिन्यांपूर्वी बागलकोट जिल्ह्यातील सुलीकेरी येथून सुमारे ४४. ७ क्विंटल दूध पावडर महाराष्ट्रात विकण्यासाठी आणली जात होती. संबंधित ट्रक व दूध पावडर कर्नाटक पोलिसांनी जप्त केली होती. दूध पावडरीच्या तस्करीची साखळीच कर्नाटकात कार्यरत आहे. या साखळीला महाराष्ट्रातील नफेखोरांची जोड मिळाल्याने ही टोळी अधिक शक्तशाली बनली आहे. नृसिंहवाडी येथील मिठाई विक्रेत्यांसाठी अकिवाट, गणेशवाडी, टाकवडे, मजरेवाडी या भागातून खवा येतो. हा भाग कर्नाटक सीमेवर असल्याने दूध पावडरची बेकायदेशीररीत्या वाहतूक होते. या दूध पावडरच्या पोत्यांवर स्पष्टपणे हे विक्रीसाठी नसल्याचे लिहिलेले असते. मात्र, यात शिरोळ, कुरुंदवाडच्या पोलिसांना मलई मिळत असल्याने तेसुद्धा ही वाहने थांबवत नाहीत. मात्र 'गांधारी'च्या भूमिकेत असणारे कर्नाटक व महाराष्ट्रातील प्रशासन यावर कठोर कारवाई करणार का ? हा प्रश्न आहे. **पावडरचा साठा** कर्नाटक राज्यातील शाळांमधील दूध पावडर विक्री करणाऱ्या एका एजंटची चौकशी केली असता, तुम्ही काही काळजी करू नका, आम्ही पावडर पाठवून देतो. फक्त आज किती पाहिजे, ते सांगा म्हणजे उद्या पोहोच होईल, असे तो म्हणाला म्हणजेच किती मोठ्या प्रमाणात एजंटांकडे या योजनेच्या पावडरचा साठा आहे, हे लक्षात येते.

# ९७ वर्षांच्या आजीबाई गिरवताहेत शिक्षणाचे धडे

## मुरबाडमधील 'आजीबाईंची शाळा' उपक्रम ठरतोय 'रोल मॉडेल'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



शिक्षण ही मानवाच्या मुलभूत गरजांपैकी एक गरज मानली जाते. शिक्षणाला कोणतीही वयोमर्यादा नसते. हेच वाक्य मुरबाड तालुक्यातील फांगणे गावात वास्तवात आले आहे. मुरबाडमधील फांगणे गावात ६० ते ९७ वय असणाऱ्या आजीबाई गेल्या ९ वर्षांपासून शिक्षणाचे धडे गिरवित आहेत. ' आम्हाला लिहता वाचता येत असते तर, शिवजयंतीच्या आनंदोत्सवात आम्हीही सहभागी झालो असतो ' अशी खंत काही वर्षांपुर्वी या आजींनी व्यक्त केली होती. यातूनच 'आजीबाईंची शाळा' या अनोख्या उपक्रमास सुरूवात झाली. हा उपक्रम आजही अविरत राबविला जात आहे. हौसा केदार या ९७ वर्षांच्या आजीबाई या उपक्रमात सहभागी होऊन शिक्षण घेत आहे, हे विशेष! मुरबाड तालुक्यातील फांगणे गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सव सुरू होता. त्यावेळी १०० महिला शिवरायाच्या चरित्राचे पठण करित होते. मात्र, यावेळी याच गावातील काही आजी पुढे आल्या. येत 'आम्हालाही लिहता वाचता येत असते तर, शिवरायांच्या आनंदोत्सवात आम्ही देखिल सहभागी झालो असतो. मात्र, लिहता वाचता येत नसल्याने सहभागी होणे शक्य नाही', अशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर आजींच्या शिक्षण यज्ञास सुरूवात झाली. ८ मार्च २०२६ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त 'आजीबाईंची शाळा' हा उपक्रम सुरू करण्यात आला. सुरूवातीला आजींना बाराखडी, मुळाक्षरे शिकवण्यात आली. त्यानंतर शब्द, वाक्य असे टप्प्या टप्प्याने शिक्षण दिले गेले. फळा, पाटीवर मोठ्या अक्षरामध्ये मुळाक्षरे लिहण्यात आली होती. फांगणे गावातील एका घरात या शाळेला सुरूवात झाली. त्यानंतर २ ते ३ वर्षांनी गावातील प्रकाश लक्ष्मण मोरे यांच्या जागेत पर्यावरणस्नेही झोपडी उभारून त्यात आजीबाईंची शाळा भरू लागली. या शाळेत फांगणे गावातील ३०आजी बाई शिक्षण घेत आहेत. आजीबाईंच्या शाळेची संकल्पना या शाळेचे व्यवस्थापक योगेंद्र बांगर यांनी मांडली. शिक्षिका शितल प्रकाश मोरे या आजीबाईंना शिक्षण देतात. (कै.) मोतीराम गणपत दलाल चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था या शाळेचे काम पाहते. या संस्थेचे अध्यक्ष दिलीप दलाल हे आजीबाईंच्या शिक्षणाची जबाबदारी पाहत आहेत.

### निरक्षरांना शिक्षणाचा आधार

निरक्षर महिलांना शिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये मध्यंतरी एक हजार महिलांसोबत स्वाक्षरी शिकवण्याचे कार्य पार पडले. आता, यामध्ये कातकरी महिलांसाठी 'आईची शाळा' हा उपक्रम राबविला जात आहे. हा उपक्रम मुरबाडमधील काही गावात घेतला जातो. आजीबाईंच्या शाळेत शिक्षणासोबतच क्रीडा महोत्सव घेतला जातो. त्यात आजी कबड्डी, खो-खो सारखे खेळ खेळतात. हस्तकला, चित्रकला, रांगोळी आदी स्पर्धाही घेतल्या जातात.

# अमळनेर तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा!

## बाजार समितीत खरेदी केंद्रास नाफेडकडून मंजुरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील बाजार समितीत सोयाबीन खरेदी केंद्रास नाफेडकरून मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. बाजार समितीस याबाबतचे पत्र मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी प्राप्त झाले आहे.

सोयाबीनला शासकीय हमीभाव मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून दीर्घकाळापासून होत होती. याबाबत बाजार समितीचे सभापती अशोक पाटील व सचिव उन्मेष राठोड यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, अखेर हे खरेदी केंद्र बाजार समितीत सुरू होणार आहे. २०२५- २६ या खरीप हंगामासाठी खरेदी केंद्रास मंजुरी मिळाली आहे. यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन थेट बाजार समितीत आणून किमान आधारभूत किंमतीनुसार (एमएसपी) विक्री करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे वाहतूक खर्च कमी होणार आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळणार आहे. अमळनेर बाजार समिती प्रशासनाकडून खरेदी केंद्र सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. तोल काटे, गोदाम व्यवस्था, संगणक नोंदणी व शेतकरी ओळखपत्र तपासणीसाठी स्वतंत्र पथक तयार करण्याचे काम सुरु आहे. लवकरच या खरेदी केंद्राचे उद्घाटन होणार आहे. अमळनेर तालुका हा जिल्ह्यातील महत्त्वाचे खरेदी केंद्र ठरणार आहे.



आधीच अतिवृष्टी, गारपीट आदींनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आम्ही शासनाकडे खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी सतत पाठपुरावा केला. अखेर नाफेडने या केंद्रास मंजुरी दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीनला आता योग्य तो दर मिळणार आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील आहोत.

– **अशोक पाटील**, सभापती, बाजार समिती, अमळनेर.

### कुंभमेळा २०२७ : जळगाव प्रशासन मिशन मोडवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नाशिक, त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा प्रशासनाने मिशन मोडवर तयारी सुरु केली आहे. मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात नाशिकचे आयुक्त शेखर सिंह यांच्या दूरचचित्रवाणी परिषद झाली. त्यानंतर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यात विमानतळ, रेल्वे आणि महामार्गावर विशेष लक्ष देण्याबाबत माहिती घेण्यात आली. पायाभुत सुविधा, मनुष्यबळ आदी विकासाच्या कामांची सविस्तर माहिती घेण्यात आली. मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# गाढ झोपेत मेंदू काय करतो?

## झोपेदरम्यान घडणाऱ्या आश्चर्यकारक गोष्टी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



माणसाचे सुमारे एक तृतीयांश आयुष्य हे झोपेतच जाते. तरीही माणूस गाढ झोपेत असताना नेमके घडते काय? याविषयी उत्सुकता आहे. झोप ही केवळ शरीर आणि मेंदू बंद पडण्याची अवस्था आहे, असाच विश्वास १९व्या शतकापर्यंत शास्त्रज्ञांमध्ये होता. मात्र, संशोधनात हे स्पष्ट झाले आहे की, झोप ही निष्क्रिय अवस्था नाही. मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी अत्यावश्यक अवस्था आहे.

रात्र गडद होत जाते, शरीर थकलेले असते आणि डोळ्यांवर झोप हलकेच आपले साम्राज्य गाजवू लागते. पण त्या शांततेच्या आड मेंदू मात्र आपले काम करीतच असतो. आपण विसावलेले असतो, पण मेंदू मात्र अथक कार्यरत असतो. काही क्षणांपूर्वीच्या चिंता, आठवणी, विचार सगळे कुठेतरी खोलवर साठवले जाते. झोपेच्या प्रत्येक श्वासाबरोबर शरीर स्वतःला नव्याने उभे करते. मन पुन्हा ताजे होते.

जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठातील न्यूरोलॉजिस्ट आणि झोपतज्ज्ञ डॉ. मार्क वू सांगतात, की झोपेतही मेंदू अत्यंत सक्रिय असतो. स्मरणशक्ती, मनःस्थिती आणि एकूण आरोग्यावर प्रभाव टाकणाऱ्या महत्त्वाच्या प्रक्रिया पार पाडतो. टप्प्यानुसार झोपेची विभागणी मानवी झोपेचे चक्र चार मुख्य टप्प्यात विभागले जाते. या टप्प्यांची रात्रभर पुनरावृत्ती होत असते. पहिल्या तीन टप्प्याना ' नॉन-रॅपिड आय मूव्हमेंट ' झोप असे म्हणतात. तर चौथा टप्पा म्हणजे 'रेम' झोप. या टप्प्याचा संबंध स्वप्नांशी सर्वाधिक असतो. नॉन- रेम झोपेच्या पहिल्या टप्प्यात मेंदू आणि शरीर जागृत अवस्थेकडून विश्रांतीकडे जातात. मेंदूची क्रियाशीलता कमी होते. स्नायू सैल होतात. काही वेळा हलक्या झटक्यांसारख्या आकस्मिक हालचाली जाणवू शकतात.

प्रक्रिया करणारा टप्पा मेंदूतील लहरी अजून संथ करतात. अधूनमधून काही जलद विद्युतक्रियांचे क्षण दिसतात. दुसऱ्या टप्प्यात शरीराचे तापमान किंचित कमी होते. श्वसन आणि हृदयाची गती मंदावते. त्याच वेळी मेंदू प्रक्रिया करून माहिती साठवण्याचे काम करतो. तिसरा टप्पा म्हणजे गाढ झोपेचा टप्पा असतो. या अवस्थेत शरीर पूर्णपणे सैल होते. हृदयाची गती, श्वसन आणि मेंदूची क्रियाशीलता अत्यंत कमी असते. हा टप्पा शरीरातील दुरुस्ती आणि उपचार प्रक्रियांसाठी तसेच सकाळी ताजेतवाने वाटण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. शेवटचा टप्पा झोप लागल्यानंतर साधारण ९० मिनिटांनी सुरू होतो. सुरुवातीला हा टप्पा केवळ १० मिनिटांचा असतो. मात्र, प्रत्येक चक्रानंतर त्याचा कालावधी वाढत जातो. झोपेदरम्यान डोळे पापण्यांच्या खाली जलद हालचाल करतात. श्वसन वेगवान होते आणि हृदयगती व रक्तदाब पुन्हा जवळजवळ जागृत अवस्थेच्या पातळीवर पोहोचतात. या टप्प्यातच सर्वाधिक स्वप्न पडतात. विशेष म्हणजे, वयानुसार माणसाच्या झोपेचा कालावधी हळूहळू कमी होत जातो.

झोपेची गरज ही भुकेसारखीच कार्य करते. जितका जास्त वेळ तुम्ही जागे राहता, तितकी झोपेची इच्छा वाढत जाते. मात्र, भुकेप्रमाणे झोपेवर तुमचा ताबा राहत नाही. थकवा ठराविक मर्यादपलीकडे गेल्यास शरीर जबरदस्तीने झोपू शकते. अगदी दैनंदिन काम करतानाही किंवा वाहन चालवताना झोप येऊ शकते. अत्यंत थकव्याच्या अवस्थेत काही सेकंदांसाठी 'मायक्रोस्लीप' म्हणजेच अल्प झोपेचे क्षण येऊ शकतात. व्यक्तीला त्याची जाणीवही होत नाही. मात्र, दिवसभरानंतर घेतलेली गाढ झोप (नॅप) ही नैसर्गिक झोपेचा दाब कमी करते. त्यामुळे रात्री झोप येणे कठीण होते. झोपेअभावी मेंदूला नवीन माहिती साठवणे आणि बौद्धिक कार्य पार पाडणे कठीण जाते. गाढ झोपेदरम्यान मेंदू जागेपणी साचलेले विषारी घटक बाहेर टाकतो. त्यामुळे दीर्घकाळासाठी मेंदूचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.

### शरीर झोपेचे नियमन कसे करते?

झोपेवर दोन मुख्य शक्ती नियंत्रण ठेवतात. जैविक घड्याळ (सर्केडियन रीदम) व झोपेची गरज (स्लीप ड्राईव्ह). सर्केडियन रीदम सर्केडियन रीदम हे शरीराचे अंतर्गत घड्याळ असते. हे घड्याळ प्रकाश आणि अंधारावर प्रतिक्रिया देणाऱ्या मेंदूतील पेशींच्या समूहाद्वारे नियंत्रित केले जाते. या घड्याळामुळे रात्री मेलाटोनिन या झोप आणणाऱ्या हार्मोनचे स्रवण सुरू होते. सकाळी प्रकाश पडताच ते थांबते. जॉन्स हॉपकिन्सच्या अभ्यासानुसार, पूर्णपणे आंधळे असलेल्या लोकांना झोपेच्या समस्या अधिक जाणवतात. कारण त्यांच्या मेंदूला प्रकाशातील या बदलांचा योग्य अंदाज घेता येत नाही.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# महालक्ष्मी मंत्र व बीज मंत्र

महालक्ष्मीचा बीज मंत्र आहे ‘ **ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्म्यै नमः॥** ’.
हा मंत्र आर्थिक समृद्धी, यश आणि देवीची कृपा मिळविण्यासाठी अत्यंत शक्तिशाली मानला जातो. या मंत्राचा नियमित जप केल्याने धनलाभ होतो आणि अडचणी दूर होतात, असे मानले जाते.

**महालक्ष्मी बीज मंत्र**

**मंत्र : ‘ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्म्यै नमः॥** ’

**फायदे :** हा मंत्र आर्थिक अडचणी दूर करतो आणि धन, समृद्धी व सौभाग्य प्राप्त करण्यास मदत करतो.

**जप :** हा मंत्र १०८ वेळा जपणे फलदायी मानले जाते.

**इतर लक्ष्मी मंत्र**

**लक्ष्मी गायत्री मंत्र :** ‘ ॐ महालक्ष्म्यै च विद्महे। विष्णु पयै च धीमहि। तन्नो लक्ष्मी प्रचोदयात् ॐ॥ ’

**एक साधे आणि प्रभावी मंत्र :** ‘ ॐ श्रीं ह्रीं श्रीं लक्ष्मीभ्यो नमः ॥ ’

# व्रत



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखादी गोष्ट प्राप्त करून घेण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी एखाद्या देवतेची आराधना करणे, त्यासाठी अन्नग्रहणावर आणि वर्तनावर काही बंधने घालूण घेणे, एखाद्या विशिष्ट महिन्यात, विशिष्ट तिथीला करावयाच्या धर्मकृत्याची वा पाळावयाच्या निर्बंधाची प्रतिज्ञा असा सर्वसाधारणपणे ‘व्रत’ ह्या कल्पनेचा अर्थ सांगता येईल. आज्ञापालन, नियमित अनुक्रम, धार्मिक कर्तव्य, उपासना, विधी, प्रतिज्ञा, निश्चित हेतू. इच्छा असे त्याचे वेगवेगळे अर्थ होतात. महामहोपाध्याय पां. वा. काणे ह्यांच्या मते व्रत हा शब्द वरणे, निवडणे, पसंत करणे ह्या धातूपासूनच आलेला असून त्याचा अर्थ इच्छा, संकल्पित कृत्य वा संकल्प असा होतो. वेगवेगळ्या धार्मिक उपासनांत उपासकाला आपल्या वर्तनावर, आहारविहारांवर काही निर्बंध घालून घ्यावे लागतात आणि ती उपासना म्हणजेच एक ‘व्रत’ होते. ‘व्रत’ हा शब्द ऋग्वेदात अनेकदा आलेला असून त्याचा अर्थ यथासंदर्भ ‘आज्ञा’ वा ‘निर्बंध’ तसेच ‘धार्मिक आचार’ अथवा ‘पवित्र उपासनापद्धती’ असा होतो. व्रत शब्दाशी मिळतेजुळते असे ‘ऋत’ आणि ‘धर्मन्’ हे शब्दही ऋग्वेदात येतात. इतर वेदांमधून काही स्थळी ‘व्रत’ म्हणजे ‘देवाचे नियम’ वा ‘निर्बंध’ असाही अर्थ केल्याचे दिसते.

ब्राह्मणग्रंथांत आणि उपनिषदांत ‘व्रत’ ह्या शब्दाचे ‘धार्मिक-विधी’, ‘धार्मिक प्रतिज्ञा’, ‘अन्नविषयक निर्बंध’, ‘व्रतस्थ व्यक्तीचे अन्नपदार्थ’ असे अर्थ सामान्यतः दिलेले दिसतात. ह्याशिवाय ब्राह्मणग्रंथांच्या काळात ह्या शब्दाला ‘व्यक्तीचा विशिष्ट वर्तनक्रम’ आणि ‘उपवास’ असेही अर्थ प्राप्त झाल्याचे आढळून येते. मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती यांतून ‘व्रते’ म्हणजे निरनिराळ्या प्रमादांसाठी घ्यावयाची प्रायश्चिते असाही अर्थ केलेला आहे. महाभारतात हा शब्द हाती घेतलेले धर्मकृत्य, अन्नभक्षणासंबंधीची वा सर्वसाधारण आचारणासंबंधीची प्रतिज्ञा, अशा अर्थाने आलेला दिसतो.

**व्रतांचे स्वरूप तीन प्रकारचे असल्याचे दिसते :**

(1) प्रायश्चित्त घेण्यासाठी करावयाची व्रते.

(2) एखाद्या विशिष्ट भूमिकेत वा अवस्थेत करावयाची आवश्यक अशी कृत्ये वा कर्तव्ये. उदा.- ब्रह्मचार्याने वा गृहस्थाश्रमी व्यक्तीने जी करावयाची असतात, ती.

(3) एखादा विशिष्ट हेतू साध्य करून घेण्यासाठी स्वेच्छेने स्वीकारलेली कृत्ये.

श्रीदत्ताने आपल्या ‘समयप्रदीप’ ह्या ग्रंथात म्हटले आहे की, प्रत्येक संकल्प म्हणजे व्रत नव्हे. संकल्प हा जर व्रत ठरावयाचा असेल, तर शास्त्रांनी न सांगितलेली कोणतीही अट त्यात असता कामा नये. रघुनंदनाच्या मते ज्या विधींबद्दल संकल्प केलेला असतो, असे विधी म्हणजे व्रत आणि उपवास हे त्याचे लक्षण होय. ‘पूजा इत्यादी ज्यात असतात असा एक ‘धार्मिक विधी’ म्हणजे व्रत होय, अशी व्याख्या धर्मसिंधूने दिली आहे.

एखादे व्रत करण्यापूर्वी काय काय केले पाहिजे, ह्यासंबंधीचे मार्गदर्शनही काही ग्रंथांतून करण्यात आलेले आहे. सर्व व्रतांच्या शेवटी जप, तप, दाने करावयाची असतात. व्रतस्थ व्यक्तीने दया, क्षमा, सत्य, दान इ. सद्गुणांची जाणीव ठेवून वर्तन केले पाहिजे.

भारतात इसवी सनापूर्वी अनेक शतके काही जुनी व्रते प्रचारातून गेली होती. वेदोक्त यज्ञांशी संबंधित अशी व्रतेही क्वचितच केली जात. पुराणांतून निर्देशिलेल्या व्रतांना स्मृतिकारांनी तसेच धर्मसूत्रांनी व गृह्यसूत्रांनी महत्त्व दिलेले दिसत नाही. व्रते ही सर्वसामान्य माणसांच्या आवाक्यातील असल्याने त्यांचा प्रसार होऊ शकला. व्रत अमुक लोकांनी करावे असे बंधन नव्हते. विवाहित स्त्रिया, कुमारिका आणि विधवा यांच्याप्रमाणेच वेश्याही व्रते करू शकत. हळूहळू व्रतांची संख्या वाढत गेलेली दिसते. अकराव्या शतकातील राजमार्तंड या ग्रंथात २४ व्रतांचा उल्लेख दिसतो, तर बाराव्या शतकातील कृत्यकल्पतरूमध्ये १७५ व्रते सांगितलेली दिसतात. हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणीत ७०० व्रतांची माहिती आहे.

व्रते ही कोणत्याही वर्णाच्या व्यक्तीला करता येतात. स्त्रियांनाही व्रते करण्याचा अधिकार आहे, किंबहुना बरीचशी व्रते स्त्रियांसाठीच सांगण्यात आली आहेत. आजारी पडल्यामुळे अथवा अपघातासारखे काही कारण घडल्यास अनेकदा घेतलेले व्रत स्वतः करणे शक्य नसते. अशा परिस्थितीत प्रतिनिधीकरवी ते करता येते.

बहुतेक व्रते काम्य असतात. व्रतांचे बाह्य स्वरूप धार्मिक असले, तरी खरे पाहता त्यांमागील अनेक संकल्प वा कामना ऐहिक स्वरूपाच्या असल्याचे दिसून येते.

व्रते ही मानसिक, वाचिक आणि कायिक अशा तीन प्रकारांची असतात. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य ही मानसिक व्रते आहेत, तर उपवासासारखी व्रते कायिक होते. नामजप, कीर्तन, वेदांचा अभ्यास ही वाचिक व्रतांची काही उदाहरणे होत. प्रत्येक व्रताला त्याच्या कालाचा संदर्भ असतो. त्याचप्रमाणे ती विशिष्ट देवतेच्या उपासनेसाठी केली जातात. कालानुसार मासव्रते, तिथीव्रते, नक्षत्रव्रते, वारव्रते इ. व्रते आहेत, तर देवतेनुसार गणेशव्रते, सूर्यव्रते, विष्णुव्रते अशी व्रते आहेत. वटसावित्री सारखी काही व्रते फक्त स्त्रियांसाठी असतात.

व्रते आणि उत्सव ह्यांच्यातील सीमारेषा तशी धूसर असते. धार्मिक उत्सवांमध्ये काही विधी येतात, तर व्रतांमधला काही भाग उत्सवी स्वरूपाचा असतो. उद्यापन करणे म्हणजे एखाद्या व्रताची समाप्ती करणे. ह्याला ‘ पारण ’ अथवा ‘ पारणा ’ असेही म्हणतात.

# गंध लावण्याचे काय आहेत फायदे ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अंघोळ झाल्यावर कपाळ मोकळे ठेवू नये, असे आपले पूर्वज सांगत होते. त्याला शास्त्राधार काय होता ते जाणून घेऊया. धर्मशास्त्र सांगते, की गंध ही केवळ धर्माची नव्हे, तर मनुष्याच्या अस्तित्त्वाची खूण आहे. अलीकडेच आंतरराष्ट्रीय स्तरावर बुद्धिबळ खेळणाऱ्या आर. प्रज्ञानंधा या भारतीय खेळाडूला परदेशात मुलाखतीदरम्यान विचारण्यात आले, ‘ तू कपाळावर ही विभूती का लावतोस ?’ त्यावर सोळावर्षीय प्रज्ञानंधा म्हणाला, ‘ माझी आई मला सांगते म्हणून !’ मित्रांनो, सोळावर्षीय प्रज्ञानंधाच्या जागी आपण असतो, तर कदाचित आपणही हेच उत्तर दिले असते. कारण बालपणापासून आपल्यावरही हा संस्कार आपल्या आई, आजीने घातला आहे. त्यानुसार आपण कपाळाला गंध लावतोसुद्धा ! मात्र ते का लावावे ? किंवा ते लावल्याने होणारे फायदे कोणते ? की ती केवळ धार्मिक खूण आहे, याबद्दल सविस्तर जाणून घेऊ.

‘ देह देवाचे मंदिर ’ असे आपण म्हणतो. ज्याप्रमाणे मंदिरात सर्वत्र ईश्वर व्यापून उरलेला असतो त्याप्रमाणे देहातील रोमारोमात होणारे स्फुरण हे ईश्वरीभावाकडे खेचणारे असते. हृदय, यकृत, मेंदू, मूत्रपिंड ही स्थाने तंदुरुस्त असतील तरच देह तंदुरुस्त राहतो. हे अवयव म्हणजे देह मंदिराचे स्तंभ आहेत. या देहात भगवंत नित्य वास करतो. या देहस्थित मूर्तीस गंध लावणे म्हणजे छोटीशी देवपूजाच आहे. ज्या संसारी माणसांना पूजेसाठीदेखील वेळ नसतो त्यांनी किमान स्नान झाल्यावर कपाळावर गंध लावून अंतरात्म्याची पूजा जरूर करावी. गंध लावण्यामागे रहस्य म्हणजे गंध लावताना अंगुलीस्पर्श होतो. ही अंगुली मध्यमाच असावी. म्हणजे मधले बोट असावे. त्या बोटाचा थेट हृदयाशी संबंध आहे. अंगुलीतून प्रवाहित होणारी स्पंदने थेट हृदयाला जाऊन भिडतात.

गंध लावण्याचे व्यावहारिक कारण म्हणजे गंध लावणारा मनुष्य सहसा पापकर्मास प्रवृत्त होत नाही. कारण तो देवाचे अस्तित्व मानणाऱ्यांपैकी एक असतो. सकाळी कपाळावर गंध लावून केलेली मानसपूजा दिवसभर आपण देवाच्या साक्षीने काम करत आहोत, याची जाणीव देत राहते. जणू काही आपल्या प्रत्येक घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवणारा तो सीसीटीव्ही कॅमेरा असतो. त्याचा ऑपरेटर हृदयसिंहासनावर विराजमान झालेला असतो. आपण कोणाच्या निगराणीत आहोत, हे कळल्यावर जसे वाईट कृत्य करण्यास धजावत नाही त्याप्रमाणे ‘ माझ्याकडे देव माझा पाहतो आहे ’ ही जाणीव गंधाद्वारे सातत्याने होत राहते.

गंध लावणाऱ्या व्यक्तीकडे समाजदेखील संस्कृतीरक्षक या भूमिकेतून पाहतो. ही केवळ धार्मिक खूण नाही, तर स्वतःच्या अस्तित्वाची स्वतःला करून दिलेली जाणीव असते. म्हणून हिंदू धर्माने आणि आर्य संस्कृतीने तिलकविधीला धर्मात स्थान दिले आहे.

पूर्वीपासून स्त्री-पुरुष कपाळावर गंध लावत असत. त्याची जागा आता टिकल्यांनी घेतली. परंतु गंध लावण्यामागे शास्त्रीय कारणेदेखील आहेत. गंध केवळ सुगंधी म्हणून नाही, तर अनेक औषधी गुणांनी परिपूर्ण असे. चंदन, हळद, अष्टगंध, गुलाल, कृष्णचंदन इत्यादी विविध पदार्थांनी युक्त असते. आपले मस्तक शांत राहावे, गंध दरवळत राहावा आणि कपाळावरील दोन भुवयांच्या मध्ये स्थित असलेले चक्र कार्यरत व्हावे, यासाठीदेखील गंध लावले जाते. तिलकधारी व्यक्तीचा भक्तिभाव, मनाची निर्मळता, सात्त्विकता, सोज्वळता इत्यादी सद्गुणांचे दर्शन गंधातून घडते. कोणाही सुवासिनीने हळद-कुंकवाची लावलेली दोन बोटे तिच्या चेहऱ्यावरील तेज वाढवितात. कीर्तनकार, प्रवचनकार, व्याख्याते, गुरुजी, पुरोहित मंडळी अबीर, चंदन किंवा अष्टगंधाचा टिळा लावतात. तो पाहता त्यांच्याही चेहऱ्यावरचे सात्त्विक भाव उठून दिसतात. पूर्वीदेखील लढाईला जाण्यापूर्वी आणि विजयश्री मिळवून परत आल्यावर मधल्या करांगुलीने कपाळावर खालून वरच्या दिशेने गंधाचे बोट उमटवले जाई. त्याला विजयतिलक म्हटले जात असे. त्यालादेखील बहुमान होता. बहीण भावाला, पत्नी पतीला, आई मुलांना गंध लावून त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. यशस्वी व्यक्तीचेही औक्षण करून त्याला उत्तरोत्तर यश मिळत राहावे म्हणून गंध लावले जाते. एवढेच काय, तर नवीन वस्तू आणि नवीन वास्तू यांनादेखील गंध लावून पूजन केले जाते. अशा रीतीने गंध लावून आपण आपल्या अस्तित्वाची ओळख ठेवावी आणि अंतःपुरातील देवाची पूजा करून त्याच्या साक्षीने सत्कार्य करीत राहावे.

# पहाटे तुळशीला पाणी का घालावे ?



आपल्या पूर्वासुरींनी पहाटे प्रत्येकाने तुळशीला पाणी घालावे, असे सांगितले आहे. त्यापाठीमागे पुढील दोन महत्त्वाची कारणे आहेत.

**१) आध्यात्मिक महत्त्व :** याबाबत पुराणात एक कथा सांगितली जाते. जालिंदर नावाचा एक अत्यंत पराक्रमी राक्षस असतो. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने देवांना आणि साधू-संतांना पार त्राही-त्राही करून सोडलेले असते. त्याला कसे रोखायचे, असा प्रश्न सर्व देवांना पडतो. मग देव विष्णू यांना शरण जाऊन जालिंदरापासून आपले रक्षण करण्याची विनंती करतात. विष्णूंनी जेव्हा जालिंदराबाबत माहिती काढली तेव्हा त्यांना असे कळते, की त्याची पत्नी वृंदा ही सती पतीव्रता असते. तिच्या पतिव्रत्याच्या सामर्थ्यांनेच जालिंदर विजयी होत असतो. त्याला पराजित करायचे असेल, तर वृंदाच्या पतिव्रत्याचा भंग करणे हाच उपाय उरतो. ते करण्यास कुणीही धजावत नाही.

अखेर ती जबाबदारी विष्णू स्वीकारतात. जालिंदराचे रूप धारण करून विष्णू वृंदेच्या महालात जातात. आपले पती आले आहेत, असे समजून वृंदा त्यांना अलिंगन देते. तिच्या पतिव्रत्याचा भंग होताच जालिंदराचा मृत्यू होतो. देवांनी मारलेल्या बाणाने त्याचे शीर तुटते आणि ते वृंदेच्या दारात पडते. नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि विष्णू यांना विचारते, की तू कोण आहेस ? त्यावर विष्णू आपले खऱ्या रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णू यांना तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते. भगवंत तिची क्षमा मागतात. तेव्हा वृंदा म्हणते, की तू मला आता भ्रष्ट केलेस. आता मला कोण स्वीकारेल ? तेव्हा भगवंत म्हणतात, की मी तुझा स्वीकार करतो. इतकेच नव्हे; तर जे तुझी पूजा करतील. त्यांच्यावर माझी कृपा असेल. त्यानंतर वृंदा सती गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंतांना माता सीतेचा विरह सहन करावा लागला. देव दगड होऊन पडले. त्यालाच ‘ शालिग्राम ’ म्हणतात. ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले तेथे तुळशीचे रोप उगवले. तीच ही तुळस. वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते तिला ‘ वृंदावन ’ असे म्हटले जाते. तीच तुळस भगवान श्रीकृष्ण, पांडुरंग यांनीही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून ‘ शालिग्राम ’ हा जो दगड आहे त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते. म्हणूनच तिला धारण करणाऱ्यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारकऱ्यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.

**२) वैज्ञानिक महत्त्व :** जगातील प्रत्येक वनस्पती दिवसा ऑक्सिजन - ओ २ व रात्री कार्बन डाय ऑक्साईड- सीओ २ सोडते. अपवाद फक्त पिंपळ,कारण पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो. म्हणूनच भगवान श्रीकृष्ण यांनी म्हटले आहे, की सर्व वृक्षांत अश्वथ-पिंपळ आहे. मात्र तुळस ही जगातील एकमेव वनस्पती आहे, की जी दिवसा ऑक्सिजन, रात्री कार्बन डाय ऑक्साईड व फक्त पहाटे ०.०३ टक्के इतका ओझोन-०३ वायू सोडते व या वायूच्या संपर्कात मनुष्य आल्यास त्याच्या मेंदूत ५ एचटीपीएन-सेरॉटोनीन नावाचे संप्रेरक (न्यूरोट्रान्समीटर) स्त्रवते. ज्यामुळे मनुष्य दिवसभर प्रसन्न व आनंदी राहतो. तसेच त्याची रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते. आयुर्वेदानुसार तुळशीमुळे सर्दी, खोकला, ताप, त्वचारोग, मधुमेह, रक्तदाब, पोटाचे व किडनीचे विकार, कॅन्सर होत नाहीत. कारण तुळशीच्या बिया, मुळे, खोड, पाने, फुले (मंजिरी) हे सर्वच औषधी आहेत. शिवाय तुळशीतून निघणाऱ्या शुभ स्पंदनांमुळे वातावरण शुद्धी होते. या सर्व बाबींचा गहन विचार करूनच पूर्वासुरींनी पहाटे तुळशीला पाणी घालण्यास सांगितले आहे.

**इति सर्वेश्वरीचरणार्पणमस्तु...**

ज्याच्या घरची तुळस फुललेली असते, त्याच्या घरी पाण्याचा तुटवडा नसतो. जेथे रोज सायंकाळी दिवे लागण होते, तेथे भक्तीची कमतरता नसते. जेथे शुभंकरोती होते तेथे संस्कारची नांदी असते. जेथे दान देण्याची सवय असते तेथे संपत्तीची कमी नसते. जेथे माणुसकीची शिकवण असते तेथे माणसांची कमी नसते.

# देवीला सहावारीपेक्षा नऊवारी साडी अर्पण करणे का अधिक योग्य ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवीला नऊवारी साडी अर्पण करणे, हे पूजा करणाऱ्याच्या आवश्यकतेप्रमाणे देवीने नऊ रूपांच्या माध्यमातून कार्य करण्याचे प्रतीक असते. देवतेप्रती भाव असणाऱ्या आणि गुरुकृपायोगाप्रमाणे समष्टी साधना करणाऱ्या पूजकाने त्याच्या भावानुसार देवीला कोणत्याही प्रकारची साडी अर्पण केली, तरी चालू शकते. कारण त्याच्या भावामुळे अपेक्षित फळाचा लाभ त्याला होतोच. परंतु प्राथमिक टप्प्याच्या साधकाची किंवा कर्मकांडाप्रमाणे साधना करणाऱ्यांची प्रत्येक गोष्ट नियमानुसार होणे महत्त्वाचे असल्याने त्यांनी देवीला सहावारी साडीपेक्षा नऊवारी साडी अर्पण करणे योग्य आहे. नऊवारी साडीतील नऊ वार (स्तर) हे देवीची कार्य करणारी नऊ रूपे दर्शवितात. नऊवारी साडी अर्पण करणे म्हणजे मूळ निर्गुण शक्तीला, जिच्यात देवीतत्त्वाची, म्हणजेच शक्तीची सर्व रूपे सामावलेली आहेत त्या श्री दुर्गादेवीला तिच्या नऊ अंगांसह (नऊ रूपांसह) प्रगट होऊन कार्य करण्याचे आवाहन करणे होय. ‘ ९ ’ हा आकडा श्री दुर्गादेवीच्या कार्य करणाऱ्या प्रमुख नऊ रूपांचे प्रतिनिधीत्व करतो.



## देवीला अर्पण केल्या जाणाऱ्या खणाचा आकार त्रिकोणी का असतो ?

त्रिकोणी आकार हा ब्रह्मा-विष्णू-महेश यापैकी ब्रह्माच्या इच्छाशक्तीशी निगडित आहे. ब्रह्मांडातील इच्छालहरींचे भ्रमणही उजवीकडून डावीकडे त्रिकोणी आकारात संक्रमित होत असते. देवीला त्रिकोणी आकारातील खण अर्पण करणे म्हणजे आपली आध्यात्मिक उन्नती व्हावी, यासाठी आदिशक्ती श्री दुर्गादेवीची इच्छाशक्ती प्रबळ करून तिची कृपादृष्टी संपादन करणे होय.

